जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २२५ | बुधवार, ११ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## संक्षिप्त

### युद्ध आता जवळपास पूर्णपणे संपुष्टात आले

**नवी दिल्ली, ता. १० :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत सुरू असलेल्या युद्धाबाबत एक महत्त्वपूर्ण विधान केलंय. इराणविरुद्ध सध्या सुरू असलेले युद्ध आता जवळपास पूर्णपणे संपुष्टात आले आहे, अशी घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी केलीय. इराणकडे नौदल नाही, दळणवळण व्यवस्था नाही, हवाई दलही नाही. त्यांच्याकडे आता फारच कमी क्षेपणास्त्रे शिल्लक राहिली आहेत. त्यांचे ड्रोन सर्वत्र पाडले जात आहेत. इराणकडे आता लष्करी सामर्थ्यासारखे काहीही उरलेले नाही. असं म्हटलंय. ट्रम्प यांचे हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा या संघर्षामुळे केवळ पश्चिम आशियामध्येच नव्हे, तर संपूर्ण जगभरातच मोठी खळबळ उडाली आहे. ऊर्जा पुरवठ्याबाबत चे संकट दिवसेंदिवस अधिकच गडद होत चालले आहे. मात्र, इराणने ट्रम्प यांचे हे दावे पुन्हा एकदा फेटाळून लावले आहेत. हे युद्ध कधी संपवायचे, हे अमेरिका नव्हे, तर इराणच ठरवेल, असे इराणने ठामपणे नमूद केलंय.

# कदमवाकवस्तीतील गुलस्था बेकरीत उंदरांचा धुमाकूळ

## नागरिकांच्या आरोग्याशी खेळ; अन्न व औषध प्रशासन झोपेत?

**लोणी काळभोर, ता. १० :** कदमवाकवस्ती (ता. हवेली) परिसरातील बेकरी व्यवसायातील गलथानपणा आणि प्रशासनाची निष्क्रियता पुन्हा एकदा समोर आली आहे. राजधानी बेकरीमध्ये अळ्या, न्यू क्रॉन बेकरीमध्ये अन्नपदार्थ झाकण्यासाठी गलिच्छ चादरी वापरण्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर अवघे आठ महिनेही लोटले नाहीत, तोच आता गुलस्था बेकरीमध्ये उंदरांचा धुमाकूळ सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार सोम वारी (ता. ०९) समोर आला आहे. या बेकरीतील केक व अन्नपदार्थांवर उंदरांनी अक्षरशः राज्य प्रस्थापित केल्याचा व्हिडीओ नागरिकांनी व्हायरल केला असून नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे.

कदमवाकवस्ती येथील पाण्याच्या टाकीजवळ असलेल्या गुलस्था बेकरीमध्ये उंदीर मुक्तपणे फिरताना आढळून आले. नागरिकांनी हा प्रकार मोबाईलमध्ये कैद करून सोशल मीडियावर व्हायरल केला. मात्र एवढा गंभीर प्रकार उघडकीस आल्यानंतरही अन्न व औषध प्रशासन आणि आरोग्य विभाग अजूनही ढिम्म असल्याने संताप व्यक्त होत आहे. इतका मोठा प्रकार घडूनही प्रशासन कुंभकर्णाच्या झोपेत आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

बेकरी चालकांकडून बिनधास्तपणे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असतानाही प्रशासनाने अजूनपर्यंत कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. यामुळे बेकरी चालकांचा मनमानी कारभार अधिकच बोकाळल्याचे दिसत आहे. नाममात्र दंड आकारून कारवाईचे कागदी घोडे नाचवले जातात आणि त्यानंतर सर्व काही पूर्ववत सुरू होते,



असा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

पूर्व हवेलीतील अनेक बेकरींमध्ये अन्नपदार्थांवर मळके व गलिच्छ कपडे टाकले जातात, किचनमध्ये सडलेले पाव, केक आणि तळण्यासाठी वापरलेले घाणेरडे तेल आढळून येते. भिंतींवर तंबाखू आणि गुटख्याच्या पिचकाऱ्या मारलेल्या आहेत. अन्नपदार्थ बनविण्यासाठी वापरले जाणारे ट्रे कधी धुतले गेले असतील याचा कधी अंदाजही लागणार लागत नाही. कामगारांकडून कोणतेही आरोग्य नियम पाळले जात नसल्याचेही स्पष्ट दिसत आहे. अशा अस्वच्छ वातावरणात तयार होणारे अन्नपदार्थ नागरिकांच्या पोटात जात असल्याने सार्वजनिक आरोग्यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, या संदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकारी अस्मिता गायकवाड यांच्याशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांनी फोन न उचलल्यामुळे त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

**नागरिकांमध्ये संताप**

दुषित किंवा एक्सपायरी डेट संपलेल्या अन्नपदार्थांबाबत नागरिक वारंवार व्हिडीओ आणि लेखी तक्रारी करीत असतानाही प्रशासनाकडून केवळ लुटुपुटूची कारवाई केली जाते. या कारवाईमुळे संबंधित व्यावसायिकांवर कोणतीही जरब बसत नसल्याने ते पुन्हा पूर्ववत व्यवसाय सुरू ठेवतात. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि रोष निर्माण झाला आहे.

**अनधिकृत बेकरींवर कुणाचा आशीर्वाद?**

पूर्व हवेली परिसरात अंदाजे २०० हून अधिक बेकऱ्या कार्यरत आहेत. यापैकी हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या बेकरींकडे अधिकृत परवाने आहेत. बहुतांश बेकऱ्या अनधिकृतपणे सुरू असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. या बेकरींमध्ये काम करणाऱ्या काम गारांची आरोग्य तपासणी किंवा कागदपत्रांची पडताळणीही होत नसल्याचे समोर येत आहे.

म्हणूनच नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन आणि आरोग्य विभागाने या अनधिकृत बेकरींवर तातडीने धडक कारवाई करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

### चोरलेल्या रिक्षातून प्रवासी वाहतूक; सराइताकडून सहा रिक्षा जप्त

**पुणे, ता. १० :** चोरलेल्या रिक्षातून सराइताने प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय केला. रिक्षा चोरी केल्यानंतर भंगारात काढलेल्या रिक्षांचे क्रमांक वापरुन तो प्रवसी वाहतूक करत होता. काळेपडळ पोलिसांनी सराइताला अटक केली असून, त्याच्याकडून दहा लाख ७८ हजार रुपयांच्या सहा रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत.

शादाब युसुफ अन्सारी (वय-२५, रा. महंमदवाडी रस्ता, हडपसर) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. अन्सारी याने वानवडी, काळेपडळ, चंदननगर, पिंपरीतील संत तुकारामनगर परिसरातून रिक्षा चोरल्याचे तपासात उघडकीस आले आहे. हडपसर भागातील काळेपडळ परिसरात पोलीस कर्मचारी महादेव शिंदे हे गस्त घालत होते. त्या वेळी उंड्री परिसरात त्याने झाडाखाली रिक्षा लावली होती. अन्सारी याने तेथे लावलेली रिक्षा चोरीची असल्याची माहिती शिंदे यांना मिळाली.

त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून अन्सारीला पकडले. त्याची चौकशी करण्यात आली. तेव्हा त्याने सहा रिक्षा चोरल्याची कबुली दिली. त्याने चोरलेल्या रिक्षांना भंगारात काढलेल्या रिक्षाचे क्रमांक वाहन पाटीवर लावले होते. चोरलेल्या रिक्षाचा वापर करुन त्याने रिक्षा चालक म्हणून व्यवसाय केल्याची माहिती तपासात मिळाली.

# समाजकल्याण अध्यक्षपदासाठी शीतल कांबळे, जितेंद्र बडेकर यांच्यात चुरस

## अंतिम निर्णय उपमुख्यमंत्री पवार घेणार? जिल्हा परिषदेत राष्ट्रवादीचे एकहाती वर्चस्व

**पुणे, ता. १० :** पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाने ७३ पैकी तब्बल ५१ जागा जिंकत जिल्हा परिषदेत एकहाती सत्ता मिळवली आहे. या विजयानंतर आता जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच विविध सभापती पदांच्या निवडीसाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. विशेष म्हणजे समाजकल्याण विभागाचे अध्यक्षपद यंदा प्रथमच हवेली तालुक्याच्या वाट्याला येणार का? याबाबत जिल्ह्यात राजकीय चर्चा रंगू लागली आहे.

हवेली तालुक्याला आतापर्यंत जिल्हा परिषदेतील समाजकल्याण विभागाचे अध्यक्षपद कधीही मिळालेले नाही. मात्र यंदाच्या



निवडणुकीत हवेली तालुक्यातील दोन सदस्य अनुसूचित जाती प्रवर्गातून विजयी झाल्याने या पदासाठी हवेलीचा दावा अधिक मजबूत मनाला जात आहे. लोणी काळभोर-कदमवाकवस्ती-वडकी गटातून शीतल सुजित कांबळे आणि उरुळी कांचन-सोरतापवाडी गटातून जितेंद्र बाळासाहेब बडेकर हे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गातून निवडून आले आहेत. त्यामुळे समाजकल्याण विभागाच्या अध्यक्षपदासाठी या दोघांमध्येच थेट चुरस निर्माण झाली आहे. हवेली तालुक्याला यंदा हे महत्त्वाचे पद मिळाले, तर तालुक्याच्या राजकीय इतिहासात प्रथमच अशी नोंद होणार असल्याने स्थानिक राजकारणातही मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

पुणे जिल्हा परिषदेचे कामकाज सामान्य प्रशासन विभाग, ग्रामपंचायत विभाग, कृषी विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, शिक्षण विभाग, बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग व समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून चालते. समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून जिल्हा परिषदेकडून अनुसूचित जाती तसेच इतर वंचित घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविल्या जातात.

पान २ वर

# पोर्शे कार अपघात प्रकरण; २२ महिन्यांनी बिल्डर विशाल अग्रवाल याला जामीन मंजूर

**पुणे, ता. १० :** पुण्यातील कल्याणी नगर भागात २०२४ मध्ये झालेल्या पोर्शे अपघात प्रकरणी एक मोठी बातमी समोर आली आहे. या अपघातात पोर्श कार चालवल्याचा आरोप असलेल्या अल्पवयीन मुलाचे वडील विशाल अग्रवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

१९ मे २०२४ च्या रात्री पुण्यातील कोरेगावपार्कपरिसरातील कल्याणीनगर भागात एका पोर्शे कारने दुचाकीवरुन जाणाऱ्या दोन अभियंत्यांना धडक दिली होती. या अपघातात अश्विनी कोस्टा आणि अनिश अवधिया यांचा जागीचा मृत्यू झाला होता. अपघाताच्या वेळी गाडी चालवणारा तरूण हा १७ वर्षे आणि ८ महिन्यांचा होता आणि त्याने मद्य प्राशन केले होते. या अपघातानंतर राज्यभरात ही घटना



वेगाने पसरली. एका धनदांडग्याच्या टवाळखोर पोराने दोन निष्पापांचा कारने धडक देऊन जीव घेतला होता. यामुळे आरोपीवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जोर धरु लागली होती. या प्रकरणी सुरुवातीला पोलिसांनी निष्काळजीपणे गाडी चालवल्याचा गुन्हा दाखल केला होता, परंतु जेव्हा आरोपीने मद्याचे सेवन करुन कार चालल्याचे सिद्ध झाले. तेव्हा प्रकरण आणखी गंभीर बनले. बाल न्याय मंडळाने अवघ्या १४ तासांत आरोपीला १०० शब्दांचा निबंध, समाजसेवा आणि अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे अशा अटी घालून जामीन मंजूर केला होता. त्यानंतर देशभरात संतापजनक प्रतिक्रिया उमटल्या.

अपघातानंतर विशाल अग्रवालवर गाडीतील व्यक्तींचे रक्ताचे नमुने बदल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. साधारण घटनेपासून  महिने विशाल अग्रवाल जेलमध्ये होते. त्यानंतर आता सुप्रीम कोर्टाकडून विशाल अग्रवालला जामीन मंजूर केला असून, यामुळे त्यांना दिलासा मिळाला आहे.

विशाल अग्रवाल हे एक बांधकाम व्यावसायिक आहेत. ब्रम्हा कॉर्प हा त्यांचा बांधकाम उद्योग समुह आहे. गेल्या वर्षांपासून हा समुह पुण्यामध्ये बांधकाम व्यवसायात आघाडीवर आहे. ब्रह्मदत्त अग्रवाल यांनी हा उद्योग समुह स्थापन केला असून त्यामध्ये अनेक कंपन्या आहेत. ब्रम्हकोर्प उद्योग समूहातील ब्रम्हा मल्टीस्पेस आणि ब्रम्हा मल्टीकॉन या कंपन्यांची जबाबदारी ब्रम्हदत्त अग्रवाल यांच्याकडून त्यांचा मुलगा सुरेंद्र अग्रवाल आणि त्यानंतर आता सुरेंद्र यांचा मुलगा विशाल अग्रवाल यांच्याकडे आली आहे. विशाल अग्रवाल यांना आलिशान गाड्यांचा प्रचंड शौक आहे. यातीलच एक गाडी म्हणजे पोर्शे कार. या कारची किंमत कोटींच्या घरात आहे.

# स्त्री आरोग्य जागर सप्ताहाची उत्साहात सांगता; यवत येथे योगासन वर्गांचे आयोजन

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. १० : जागतिक महिला दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. या निमित्ताने यवत येथे अनुराग चॅरिटेबल ट्रस्ट आणि हिरकणी महिला प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्री आरोग्य जागर सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या या उपक्रमाची सांगता आंतरराष्ट्रीय महिला दिनी करण्यात आली.

हिरकणी वुमन्स योगा अँड जिम येथे १ मार्चपासून सुरू झालेल्या या सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून भाजपच्या दौंड तालुका अध्यक्षा शीतल शेळके, नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्या तेजस्विनी पडळकर तसेच विविध क्षेत्रातील



महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

या शिबिराच्या माध्यमातून महिला व मुलींसाठी मोफत योगासन, प्राणायाम, सूर्यनमस्कार आणि बालयोगासन वर्ग घेण्यात आले. यावेळी संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा हिरकणी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. राजकीय क्षेत्रातून माजी सरपंच सुनंदा यादव, सामाजिक क्षेत्रातून कश्मिरा मेहता आणि शैक्षणिक क्षेत्रातून सुवर्णा खराडे यांना शाल, श्रीफळ व हिरकणी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या योगासन वर्गातील विविध स्पर्धांमधील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

यावेळी अनुराग चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापिका सुनीता काटम यांनी संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. हिरकणी महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा शीतल विक्रांत दोरगे यांनी महिलांच्या दैनंदिन जीवनात व्यायामाचे महत्त्व पटवून देत लवकरच मुलींना स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्याची घोषणा केली.

# लोणी काळभोर, कदमवाकवस्ती ग्रामपंचायतींसाठी कचरा प्रकल्प दोन महिन्यात उभारणार : प्रशांत काळभोर

**लोणी काळभोर, ता. १० :** गेल्या अनेक वर्षांपासून लोणी काळभोर परिसरात कचऱ्याचा प्रश्न गंभीर बनला होता. नदीपात्रात टाकला जाणारा कचरा, त्यातून होणारे प्रदूषण आणि वारंवार लागणाऱ्या आगीमुळे नागरिक त्रस्त झाले होते. मात्र आता या प्रश्नावर अखेर कायमस्वरूपी तोडगा निघण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडले असून पुढील दोन महिन्यांत कचरा वर्गीकरण व प्रक्रिया प्लांट उभारला जाणार आहे. अशी माहिती पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर यांनी दिली. त्यामुळे लोणी काळभोरच्या कचऱ्याच्या प्रश्नाला कायमचा पूर्णविराम मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

कचऱ्याच्या वाढत्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी हवेली उपविभागीय अधिकारी कार्यालयात सोमवारी (ता.९) दुपारी चार वाजण्याच्या सुमारास बैठक पार पडली. या बैठकीत कचऱ्याचे वैज्ञानिक पद्धतीने वर्गीकरण करून त्याची कायम स्वरूपी विल्हेवाट लावण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. बैठकीस एमआयटी शिक्षण समूहाचे कार्याध्यक्ष मंगेश कराड, कुलगुरू महेश चोपडे, हवेलीचे उपविभागीय अधिकारी यशवंत माने, लोणी काळभोरचे अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते, सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, गटविकास अधिकारी शेखर शेलार, लोणी काळभोरचे सरपंच तथा प्रशासक नागेश काळभोर, माजी सरपंच चित्तरंजन



गायकवाड, उपसरपंच नासिर पठाण तसेच दोन्ही ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रशांत काळभोर म्हणाले की, या बैठकीत लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीतील गट क्रमांक ११३ ही ७.३४ हेक्टर सरकारी जमीन कचरा प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आली. या जागेची सर्वप्रथम अधिकृत मोजणी करण्यात येणार असून त्यानंतर लोणीकंदच्या धर्तीवर आधुनिक कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पामुळे कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर आणि वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे शक्य होणार आहे.

या प्रकल्पासाठी लोणी काळभोर ग्रामपंचायत, कदमवाकवस्ती ग्राम पंचायत आणि एमआयटी शैक्षणिक संकुल यांच्या संयुक्त पुढाकारातून काम केले जाणार आहे. एमआयटी विद्यापीठाच्या माध्यमातून सीएसआर निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पासाठी कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध करून देण्याचाही तोडगा बैठकीत काढण्यात आला.

जिल्हा परिषद आणि पीएम आरडीएच्या माध्यमातून शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांच्या पुढाकाराने पुणेसोलापूर महामार्गालगत एक मोठा कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची तयारी सुरू आहे. पुढील एक वर्षाच्या आत हा प्रकल्प कार्यान्वित होणार असून त्याचा फायदा पुणेसोलापूर महामार्गावरील सुमारे २५ ते ३० गावांना होणार आहे. असेही प्रशांत काळभोर यांनी सांगितले आहे.

दरम्यान, कचऱ्याच्या प्रश्नामुळे निर्माण झालेली पर्यावरणीय समस्या, दुर्गंधी आणि आरोग्याच्या तक्रारी यावर कायमचा तोडगा निघण्याची शक्यता आहे. प्रस्तावित प्रकल्प वेळेत पूर्ण झाल्यास लोणी काळभोर परिसरातील कचरा व्यवस्थापनाला शाश्वत दिशा मिळणार आहे.

पुणे प्राईम न्यूज



## संक्षिप्त



### इंदापूर तालुक्यात तहसीलदारांना मारहाण; महसूल कर्मचाऱ्यांचे लेखणी बंद आंदोलन

**इंदापूर, ता. १० :** इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी परिसरात शासकीय कारवाईदरम्यान तहसीलदार जीवन बनसोडे यांना मारहाण करण्यात आली. या घटनेची तक्रार तहसीलदारांच्या फिर्यादीवरून इंदापूर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या घटनेच्या निषेधार्थ महसूल विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी लेखणी बंद आंदोलन करत निषेध नोंदवला. मिळालेल्या माहितीनुसार, निमगाव केतकी ते पिटकेश्वर रोडवर मुरूम वाहतूक करणाऱ्या टिपरची तपासणी सुरू असताना संतोष रामदास मोरे (रा. वरकुटे खुर्द) या आरोपीने शासकीय वाहनासमोर मोटारसायकल आडवी लावून कारवाईमध्ये अडथळा निर्माण केला. तसेच त्यांनी शिवीगाळ करत तहसीलदार जीवन बनसोडे यांचा शर्ट धरून मारहाण केली आणि दहा हजार रुपयांची मागणी केली. इंदापूर पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे महसूल विभागात सामाजिक व प्रशासनिक खळबळ उडाली असून, पोलिस तपास सुरू आहे.

### घरगुती गॅस पुरवठ्याबाबत सरकारचा महत्वपूर्ण निर्णय

**पुणे, ता. १० :** सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्यातील व्यत्यय आणि एलपीजी पुरवठ्यातील निर्बंध लक्षात घेता, मंत्रालयाने तेल रिफायनरीजना अधिक एलपीजी उत्पादन करण्याचे आणि त्या अतिरिक्त उत्पादनाचा वापर घरगुती एलपीजीसाठी करण्याचे आदेश जारी केले आहेत. मंत्रालयाने घरगुती एलपीजी पुरवठ्याला घरगुती ग्राहकांना प्राधान्य दिले असून, साठेबाजी आणि काळ्या बाजाराला रोखण्यासाठी २५ दिवसांचा इंटर-बुकिंग कालावधी सुरू केला आहे. दरम्यान, आयातित एलपीजी पासून होणाऱ्या नॉन-डोमेस्टिक पुरवठ्याला रुग्णालये आणि शैक्षणिक संस्थांसारख्या आवश्यक नॉन-डोमेस्टिक क्षेत्रांना प्राधान्य देण्यात येत आहे. अशी माहिती देत पेट्रोलियम मंत्रालयाचे गॅस पुरवठ्याबाबत स्पष्टीकरण दिलंय. पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या इराण-इस्त्रायलच्या संघर्षाचा फटका आता भारताला बसत असल्याचं दिसून येतंय. या युद्धाच्या पार्श्व भूमीवर केंद्र सरकारने एलपीजी सिलेंडरबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने घरगुती एलपीजी सिलेंडरच्या बुकिंगमधील अंतर २१ दिवसांवरून वाढवून २५ दिवस इतके केले आहे. त्यामुळे ग्राहकांना आता एक गॅस बुकिंग केल्यापासून २४ दिवसांनी दुसरा गॅस बुकिंग करता येणार आहे. असं असताना घरगुती गॅस वापरला सरकारने प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे.

### गायरान जमिनीवरील आरक्षण उठवले

**मुंबई, ता. १० :** महाराष्ट्र विधानसभेत जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक मंजूर करण्यात आलंय. त्यामुळे आता महापालिका आणि नगरपालिका क्षेत्रातील हजारो हेक्टर गायरान जमीन सार्वजनिक कामांसाठी वापरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडलेले महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. महाराष्ट्र विधानसभेत जमीन वापरासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. या विधेयकामुळे महापालिका आणि नगरपालिका हद्दीतील गायरान जमिनींच्या वापराबाबत मोठा बदल होणार आहे. हजारो हेक्टर गायरान जमीन सार्वजनिक जनहिताच्या कामांसाठी वापरण्याचा मार्ग आता मोकळा होणार आहे. नव्या निर्णयानुसार राज्यातील मनपा आणि नगरपालिका क्षेत्रातील गायरान जमिनीवरील काही आरक्षण उठवण्यात येणार आहे.

# व्ही. के. सिंगकडून पिंकी माळीच्या कुटुंबियांना धमकी? : अमोल मिटकरी

**पुणे, ता. १० :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात निधन झाल्यानंतर वेगवेगळे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणावरुन भूमिका मांडत व्हीएसआर कंपनीच्या मालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. अजितदादांचा अपघात नाही तर घातपात असल्याचा मोठा दावाही त्यांनी केला आहे.

त्यांच्या दाव्याला अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते आमदार अमोल मिटकरी यांनी सहमती दर्शवली आहे. ते देखील माध्यमांना प्रतिक्रिया देताना आणि सोशल मीडियावर पोस्ट करताना हा दावा सातत्याने करताना दिसत आहेत. आता त्यांनी एक्सवरील अकाऊंटवरून एक



ट्वीट केले आहे. ज्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

विमान अपघातात पायलट पिंकी माळी या तरुणीला देखील आपला जीव गमावला लागला. या दुर्दैवी घटनेचा मोठा आघात माळी कुटुंबावर झाला आहे. पिंकीची आई रुग्णालयात उपचार घेत आहे. तिच्या आईची अमोल मिटकरींनी भेट घेतली. यावेळी त्यांनी तब्येतीची विचारपूस केली. यावेळी पिंकी यांचे वडील आणि भाऊ देखील उपस्थित असल्याचे मिटकरींनी ट्वीटमध्ये म्हटले आहे.

या ट्वीटमध्ये त्यांनी व्हिएसआर कंपनीचा मालक व्ही के सिंग याने वॉट्सअप कॉल करून मीडियापासुन दुर राहण्याची भावाला धमकी दिल्याचा दावा केला आहे. तसेच त्यांनी ट्वीटमध्ये एक मोठी शंका उपस्थित केली आहे. हे प्रकरण वरवर जस दिसतंय तस सोप नाहीये. आपल्या दादांचा घात झालाय, असे अमोल मिटकरी म्हणाले आहेत.

**नेमकं काय म्हणाले मिटकरी?**

गेल्या तेरा दिवसांपासून उपचार घेत असलेल्या पिंकी माळीच्या आईच्या तब्येतीची आज हॉस्पिटल ला जाऊन विचारपुस केली. यावेळी तिचे वडील व भाऊ उपस्थित होते. व्ही.एस.आरचा मालक व्ही. के सिंग याने वॉट्सअप कॉल करून मीडियापासुन दुर राहण्याची भावाला धमकी दिल्याचे ठशलीवशव कॉल वर ऐकले. ज्यात पायलट ने अजित पवार इनके फ्लाईट को ठोक दिया अशी वापरलेली भाषा ही व्ही. एस.आरचे अंडरवर्ल्ड शी संबंध तर नाही ना? अशी शंका उपस्थित करते. एक मात्र खरंय हे प्रकरण वरवर जस दिसतय तस सोप नाहीये. आपल्या दादांचा घात झालाय.

**व्ही. के. सिंगचा धक्कादायक जबाब**

अजितदादांच्या विमान अपघाता प्रकरणी व्ही. के. सिंग यांनी धक्कादायक जबाब दिला आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात प्रकरणात पायलट सुमित कपूर याची चूक आहे. अपघात प्रकरणात माझी चूक असेल तर मला कठोर शिक्षा करा. त्यांच्या या धक्कादायक जबाबमुळे त्यांच्यावर टीका करण्यात येत आहे. मागील तीन दिवस व्ही. के सिंग यांची पुण्यातील सीआयडी कार्यालयात चौकशी केली जात आहे.

### लाडक्या बहिणीचा फेब्रुवारीचा हप्ता अजूनही थकीत

मुंबई, ता. १० : लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना फेब्रुवारीचा हप्ता देण्यात आलेला नाही. फेब्रुवारी महिना संपून गेला आहे त्यानंतर मार्चचे पहिले १० दिवस उलटून गेले आहेत तरीही महिलांच्या खात्यात पैसे जमा झालेले नाहीत. फेब्रुवारीचा हप्ता जवळपास दीड महिना पुढे ढकलला आहे. त्यामुळे पैसे कधी येणार, असा प्रश्न विचारला जात आहे.

फेब्रुवारीचा हप्ता मार्च महिन्याच्या शेवटच्या दोन आठवड्यांमध्ये येऊ शकतो. गेल्या अनेक दिवसांपासून महिन्याच्या शेवटच्या दोन आठवड्यात महिलांच्या खात्यात पैसे जमा केले जातात. त्यानंतर आतादेखील शेवटच्या आठवड्यात पैसे जमा केले जाऊ शकतात. दरम्यान, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. एकीकडे फेब्रुवारीचा हप्ता कधी येणार, असा प्रश्न विचारला जात आहे. दुसरीकडे फेब्रुवारी आणि मार्चचा हप्ता एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# जहाज सोडा, एक लिटरही तेल देणार नाही; अमेरिकेच्या धमकीवर इराणचे थेट प्रत्युत्तर

**मुंबई, ता. १० :** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तेल पुरवठा बंद केला तर इराणवर मोठा हल्ला केला जाईल, या इशाऱ्यावर इराणने कडक प्रतिक्रिया दिली आहे.

इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने ट्रम्प यांना कडक प्रतिक्रिया दिली आहे, ज्यात म्हटले आहे की तेलाची वाहतूक तर सोडाच, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून एक लिटरही तेल जाऊ दिले जाणार नाही.होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा हा इशारा संपूर्ण जगासाठी धोक्याचा इशारा आहे आणि येत्या काळात इंधनाच्या किमती आणखी वाढू शकतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. डोनाल्ड



ट्रम्प म्हणाले होते की, जर इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेलाचा प्रवाह रोखला तर अमेरिका विनाश करेल. या विधानानंतर काही तासांतच, इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने पाच शब्दांत उत्तर दिले. एक लिटरही तेल नाही. तज्ज्ञ शनाका अँस्लेम परेरा यांनी, या घडामोडीमुळे जगातील प्रत्येक ऊर्जा बाजारपेठेत भीती निर्माण झाली पाहिजे. असे म्हटले आहे. त्यांच्या मते, हे जगभरातील वाढत्या ऊर्जा संकटाचे थेट संकेत आहे. इराणच्या रेव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने याविषयी, जर अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर हल्ले सुरू ठेवले तर होर्मुझच्या सामुद्रधुनीतून एक लिटरही तेल जाऊ दिले जाणार नाही.

शिवाय, इराणने इशारा दिला आहे की, जर गरज पडली तर संपूर्ण प्रदेशातून तेल पुरवठा खंडित केला जाईल. याचा अर्थ असा होईल की जगाला सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, कुवेत, बहरीन, कतार आणि इराक सारख्या देशांकडून तेल मिळू शकणार नाही. यामुळे जागतिक तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ होऊ शकते.

**वाढत्या तणावामुळे संकट आणखी वाढू शकते**

अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावावरून स्पष्ट होते की येत्या काळात हे संकट आणखी वाढू शकते. ट्रम्प सतत इराणवर हल्ले तीव्र करण्याबद्दल बोलत आहेत. जर अमेरिका आणि इस्त्रायली हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणने या प्रदेशातून ऊर्जा निर्यात थांबवली तर जगभरात मोठे ऊर्जा संकट निर्माण होऊ शकते.

### पुणे–नगर महामार्गावर अपघातात एकाचा मृत्यू

**शिक्रापूर, ता. १० :** पुणेअहिल्यानगर महामार्गावरील शिक्रापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुचाकी व टेम्पो ट्रॅव्हल यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. महेश धोंडीराम भगत (वय-४४) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. तर दुचाकीवर मागे बसलेला युवक वेळीच उडी मारून बाजूला झाल्याने थोडक्यात बचावला. या अपघाताचे दृश्य सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (ता. ०८) रोजी मध्यरात्री सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास महेश भगत हे दुचाकीवरून पुणेअहिल्यानगर महामार्गावर शिक्रापूर हद्दीतून जात होते. हॉटेल रानवारा समोरील दुभाजकाजवळ वळण घेत असताना समोरून आलेल्या टेम्पो ट्रॅव्हलने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी तीव्र होती की महेश भगत दुचाकीसह काही अंतर रस्त्यावर घासत पुढे फेकले गेले.

दरम्यान, अपघात होणार असल्याचे लक्षात येताच दुचाकीवर मागे बसलेल्या युवकाने तत्काळ उडी मारून मागे सरकल्याने त्याचा जीव वाचला. हा संपूर्ण अपघात हॉटेल लकी समोरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. घटनेची माहिती मिळताच शिक्रापूर पोलीस तसेच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी महेश भगत यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेचा पुढील तपास शिक्रापूर पोलीस ठाण्याचे पोलिस हवालदार कुदळे करीत आहेत.

### कोरेगाव मूळचे माजी सरपंच बापूसाहेब बोधे यांचे अल्पशा आजाराने निधन



**उरुळी कांचन, ता. १० :** हवेली तालुक्याचे ज्येष्ठ नेते कोरेगाव मूळ (ता. हवेली) येथील माजी सरपंच बापूसाहेब यशवंत बोधे यांचे मंगळवारी (ता. १०) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, असा मोठा परिवार आहे. शासन मान्यताप्राप्त ठेकेदार संतोष बोधे व महात्मा गांधी विद्यालयाचे शिक्षक राजेंद्र बोधे सर यांचे ते वडील होत. बापूसाहेब बोधे यांनी थेऊर येथील यशवंत कारखान्याचे व हवेली बाजार समितीचे संचालक पदावर काम केले होते. मागील ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकीत पती-पत्नी असे दोघेही सदस्य म्हणून निवडून आले होते. याच कालवधीत त्यांनी स्वतः सरपंचपद तर पत्नीने उपसरपंचपद भूषवले होते. तर कोरेगाव मूळ सोसायटीचे अध्यक्षपद ही भूषवले होते. दरम्यान, बापूसाहेब बोधे यांच्यावर कोरेगाव मूळ येथील स्मशानभूमीत मंगळवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# समाजकल्याण अध्यक्षपदासाठी शीतल कांबळे, जितेंद्र बडेकर यांच्यात चुरस

**पान १ वरुन :** वस्ती विकास, शिष्यवृत्ती, वसतिगृह सहाय्य, आंतरजातीय विवाह प्रोत्साहन, वृद्धाश्रम योजना, दिव्यांग कल्याण तसेच रोजगार व कौशल्यविकास उपक्रम यामध्ये प्रमुखत्वाने समाविष्ट आहेत.

जिल्हा परिषद आपल्या उत्पन्नातील किमान २० टक्के निधी मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी खर्च करते. वस्ती विकासासाठी ४ ते ४० लाखांपर्यंत निधी दिला जातो, तर आंतरजातीय विवाहासाठी ५० हजार रुपयांचे अनुदान उपलब्ध आहे. दिव्यांग व यशवंत निवारा योजनेंतर्गत घरकुलासाठी १.२० लाख रुपये सहाय्य दिले जाते. तसेच कमवा व शिका योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दरमहा १२ ते १४ हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. समाजमंदिर ते ज्ञानमंदिर या योजनेतून समाजमंदिरांना ग्रंथालय व डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्याचा उपक्रमही राबविला जात आहे. दरम्यान, राजकीय समीकरणे, गटबाजी आणि स्थानिक नेतृत्वाचा प्रभाव या सर्व गोष्टींच्या पार्श्वभूमीवर हवेली तालुक्याला समाजकल्याण विभागाचे अध्यक्षपद मिळते का, तसेच जिल्हा परिषदेत सत्ता मिळवलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत समीकरणे कशी जुळतात, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठीही राजकीय वातावरण तापले असून या पदासाठी अनेक दिग्गजांच्या वारसांनी दावा केला आहे. अध्यक्षपद हे सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव आहे. त्यामुळे दौंडचे माजी आमदार रमेश थोरात यांचे चिरंजीव तुषार थोरात, इंदापूरचे माजी आमदार हर्षवर्धन पाटील यांची कन्या अंकिता पाटील-ठाकरे, तसेच भोरचे माजी आमदार काशिनाथ खुटवड यांचे चिरंजीव विक्रम खुटवड हे इच्छुक असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. याशिवाय माजी मंत्री व आंबेगावचे आमदार दिलीप वळसे पाटील यांचे पुतणे विवेक वळसे पाटील तसेच दौंड तालुक्यातील ज्येष्ठ सदस्य वीरधवल जगदाळे यांचीही नावे अध्यक्षपदासाठी पुढे येत आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवडणूकही अत्यंत प्रतिष्ठेची ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच समाजकल्याण विभागाचे अध्यक्षपद कोणाच्या वाट्याला जाणार, याबाबत अंतिम निर्णय राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार घेणार असल्याचे बोलले जात आहे. त्या पुन्हा एकदा राजकीय घराण्यांवर विश्वास दाखवणार की नव्या चेहऱ्यांना संधी देणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# टँकरच्या धडकेत वडील–मुलगा जखमी; चालकावर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. १० :** पुणे - सोलापूर महामार्गावरील टँकर चालकाच्या बेदरकार वाहनचालका मुळे दुचाकीस्वार व त्यांचा मुलगा जखमी झाल्याची घटना घडली. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील राजेंद्र पेट्रोल पंपाजवळ रविवारी (ता. ८) सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात चलकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अशोक अभिराम तोळेकर (रा. कदमवाकवस्ती, ता. हवेली) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या चलकाचे नाव आहे. याप्रकरणी अमिशचंद्र झा (वय ४८, रा. ब्रह्मासन सिटी, वडगाव शेरी, पुणे) यांनी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमिशचंद्र झा हे एस आय बी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत अकाउंटंट म्हणून करतात. अमिशचंद्र झा हे पत्नी भावना व मुलगा आर्यमन (वय १७) यांच्यासह राहतात. झा आणि त्यांचा मुलगा आर्यमन हे दर रविवारी सुट्टीच्या दिवशी उरुळी कांचन येथे जेवणासाठी जात असतात. त्यानुसार ८ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे ६.३५ वाजण्याच्या सुमारास ते त्यांच्या दुचाकीवरून (क्र. MH २५ BH ८७०९) उरुळी कांचनकडे निघाले होते.

दरम्यान, पुणे सोलापूर रोडवरील माळी मळा परिसरातील राजेंद्र पेट्रोल पंपासमोरील एक्झिट पॉईंटवर ते पोहोचले असता, पेट्रोल पंपातून बाहेर येत असलेल्या एका टँकर चालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करत बेदरकारपणे वाहन चालवत त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत अमिशचंद्र झा आणि त्यांचा मुलगा आर्यमन हे दोघेही रस्त्यावर फेकले जाऊन गंभीर जखमी झाले. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने मदत करत दोघांनाही रुग्णवाहिकेद्वारे पुण्यातील जहांगीर रुग्णालयात दाखल केले. सध्या अमिशचंद्र झा हे रुग्णालयाच्या खासगी वॉर्ड क्रमांक ४२७ मध्ये उपचार घेत आहेत, तर मुलगा आर्यमन वॉर्ड क्रमांक ११६ मध्ये उपचाराधीन आहे.

या प्रकरणी अमिशचंद्र झा यांनी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार टँकर चालक अशोक अभिराम तोळेकर याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १२५ (ब), २८१ तसेच मोटार वाहन कायदा कलम १७७, ११९ आणि १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गावठी पिस्टलसह तीन गुन्हेगार जेरबंद; फुरसुंगी पोलिसांची कामगिरी

**फुरसुंगी, ता. १० :** फुरसुंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गावठी पिस्टल व एक जिवंत राऊंड घेऊन बाळगणाऱ्या तीन गुन्हेगारांना फुरसुंगी पोलीसांच्या तपास पथकाने चारचाकी गाडीसह ताब्यात घेतले. हि करवाई शनिवारी (ता. ०८) रात्री साडे अकरा वाजण्याच्या सुमारास झांबरे गोठ्याजवळ, कोंडे वस्ती, उरुळी देवाची येथे करण्यात आली.

शुभम चिमा गायकवाड (वय २५, रा. वाल्हेकर यांचेकडे भाडयाने, हिंदवी नगर, उरुळी देवाची, ता. हवेली, जि. पुणे, मुळगाव मानेगाव वैराग, ता. बार्शी), गौरव हनुमंत भाडळे, (वय-२४, रा. आंबेडकर चौक, ऊरुळी देवाची, ता. हवेली) नागेश गोपाळ निलेवाड (वय -२३, रा. ढोलेवस्ती, समता शाळेजवळ, उरुळी देवाची, ता. हवेली) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री फुरसुंगी पोलीसांचे तपास



पथक हद्दीत गस्त घालीत असताना साडे अकरा वाजण्याच्या सुमारास पोलीस हवालदार नितीन गायकवाड व सागर वणवे यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, झांबरे गोठ्याचे जवळ, कोंडे वस्ती येथे एका लाल रंगाच्या आय २० कारमध्ये तीन इसम संशयीतरित्या थांबले असून त्यातील एकाकडे पिस्टल सारखे वेपण असण्याची शक्यता आहे.

सदरची माहिती वरिष्ठांना कळवून त्यांनी दिलेल्या आदेशानुसार, बातमीची खातरजमा व कारवाई करणेसाठी खबर मिळाल्याचे ठिकाणी पंचासह गेले. यावेळी सदर ठिकाणी आय २० कार व त्यामध्ये तीन संशयित इसम बसल्याचे दिसुन आले. पोलिसांनी त्यांना नाव व पत्ता विचारले असता त्यांनी वरीलप्रमाणे नाव व पत्ता सांगितले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांची अंगझडती दोन पंचासमक्ष घेण्यात आली. यावेळी शुभम गायकवाड याचे कंबरेला एक गावठी पिस्टल व एक जिवंत राउंड मिळून आला. त्याचे सोबत असलेल्या गौरव भाडळे, नागेश निलेवाड यांनी देखील साथीदारांसोबत येण्याबाबत समाधानकारक माहीती दिली नाही, तसेच त्यांचेकडे हत्यार बाळगण्यावावत कोणताही अधिकृत परवाना नसल्याचे दिसुन आले.

# लग्नाचे आमिष, प्रेमसंबंध आणि १२ लाखांची फसवणूक; आरोपीला सत्र न्यायालयाकडून जामीन

**नवी मुंबई, ता. १० :** मॅट्रिमोनियल वेबसाईटवर ओळख करून घेत एका महिलेची तब्बल १२ लाख ८ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याचा तसेच लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप असलेल्या आरोपीला सीबीडी बेलापूर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने अटी व शर्तीसह जामीन मंजूर केला आहे. न्यायाधीश सी. व्ही. मराठे यांनी हा आदेश दिला असल्याची माहिती आरोपीचे वकील ॲड. अजित बाबासाहेब शिंदे व ॲड. हृषिकेश हेमंत शिंदे यांनी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, नोव्हेंबर २०२४ मध्ये फिर्यादी महिलेची आरोपीसोबत एका मॅट्रिमोनियल वेबसाईटवर ओळख झाली. आरोपीने स्वतःला कॉम्प्युटर इंजिनिअर असल्याचे सांगत आयटी क्षेत्रात नोकरी करत असून वार्षिक १५ ते २० लाखांचे पॅकेज असल्याचा दावा केला. तसेच अहमदनगर येथे स्वतःचा बंगला, पुण्यातील हिंजवडी येथील हॉटेलमध्ये भागीदारी आणि भुजबळ चौक परिसरात दोन गाळे भाड्याने दिले असल्याचे सांगत महिलेचा विश्वास संपादन केला. आरोपीने आपले वडील नगरसेवक असून निवडणुकीत व्यस्त असल्याचे सांगत लग्नाची बोलणी लवकरच करू, असे आश्वासन दिले. कुंडलीत ३६ पैकी २८ गुण जुळल्याने फिर्यादीने लग्नासाठी होकार दिला. त्यानंतर आरोपीने नवी मुंबईतील मुंबई हाऊस हॉटेल, तसेच पुण्यातील



हिंजवडी येथील तमन्ना प्रीमियर हॉटेल आणि मुंबई विमानतळाजवळील आयबिस हॉटेल येथे भेटीस बोलावून स्वतः तिला पत्नी मानत असल्याचे सांगत तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवले, असा आरोप फिर्यादीने केला आहे.

दरम्यान आरोपीने व्यवसायात अडचणी असल्याचे कारण सांगत फिर्यादीकडून वेळोवेळी पैसे मागितले. सुरुवातीला जी-पे द्वारे २५०० रुपये, त्यानंतर ३ लाख रुपये, तसेच ५ लाख रुपयांचे कर्ज काढण्यास भाग पाडले. याशिवाय २५ नोव्हेंबर २०२४ ते ८ फेब्रुवारी २०२५ दरम्यान ४ लाख ८ हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने घेतले. अशाप्रकारे आरोपीने फिर्यादीकडून एकूण १२ लाख ८ हजार ५०० रुपये उकळल्याचा आरोप आहे.

मात्र लग्नाबाबत आरोपी टाळाटाळ करू लागल्याने फिर्यादीला संशय आला. पैसे परत मागितल्यावर आरोपी उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने अखेर फिर्यादीने राज्य महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेअंतर्गत कलम ६९ (लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध) आणि कलम ३१८ (४) (फसवणूक) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांनी आरोपीला अटक करून तळोजा मध्यवर्ती कारागृहात पाठवले होते. दरम्यान, आरोपीतर्फेदाखल करण्यात आलेल्या जामीन अर्जावर सुनावणी करताना बचाव पक्षाकडून फिर्यादी व आरोपीमध्ये प्रेमसंबंध होते आणि आर्थिक मदत ही परस्पर संमतीने झाली, असा युक्तिवाद ॲड. अजित शिंदे यांनी केला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीला अटी व शर्तीसह जामीन मंजूर केला. या प्रकरणात ॲड. निकिता सतिश भोगील आणि ॲड. विश्वजा शैलेश सामंत यांनी सहकार्य केले.

# आमदार राहुल कुल यांच्या प्रमुख मागणीची मुख्यमंत्र्यांकडून दखल

**दौंड, ता. १० :** मुंबई: राज्यात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विधानसभेत हा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला. आमदार राहुल कुल यांनी सोशल मीडियावरून फेक अकाउंट्सद्वारे होणारी बदनामी, ऑनलाईन फसवणूक आणि सायबर गुन्ह्यांची वाढती संख्या याबाबत सभागृहात प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्याचे आश्वासन दिले. डिजिटल माध्यमांमधील वाढत्या गैरप्रकारांवर नियंत्रण आणण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

सभागृहात बोलताना राहुल कुल यांनी राज्यातील सायबर सुरक्षेची यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज अधोरेखित केली. राज्यभर नवीन सायबर पोलीस स्टेशन उभारण्यासोबतच सुमारे १००० पोलीस अधिकाऱ्यांना आधुनिक तांत्रिक प्रशिक्षण देण्याची मागणी त्यांनी केली. महाराष्ट्र सायबर प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक तपास प्रयोगशाळा उभारणे आणि सायबर गुन्ह्यांमध्ये तज्ज्ञ असलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती येत्या ६ ते ८ महिन्यांत पूर्ण करण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

सायबर गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढवण्यासाठी विशेष फास्ट ट्रॅक सायबर न्यायालये स्थापन करण्याची गरजही त्यांनी मांडली. माहिती तंत्रज्ञान कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सायबर प्रकरणांसाठी स्वतंत्र सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती करण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले. तसेच सोशल मीडियावरून लोकप्रतिनिधी तसेच सामान्य नागरिकांची बदनामी करणाऱ्या फेक अकाउंट्सवर आळा घालण्यासाठी केंद्राच्या डिजिटल इंडिया क्टशी सुसंगत असा स्वतंत्र सायबर सुरक्षा कायदा करण्याची मागणी त्यांनी केली.

फेक प्रोफाइल्स आणि दिशाभूल करणाऱ्या पोस्ट्सवर त्वरित नियंत्रण ठेवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच ख आधारित रिअल-टाइम मॉनिटरिंग प्रणाली विकसित करण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला. या तंत्रज्ञानाच्या मदतीने बदनामीकारक मजकूर मोठ्या प्रमाणात पसरायच्या आधीच त्यावर कारवाई करता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर देताना या विषयाचे गांभीर्य मान्य केले. सोशल मीडियावर कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय व्यक्ती किंवा संस्थांची बदनामी करण्याच्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी कायद्यात आवश्यक बदल करण्यासाठी पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

# आयसीसीकडून टीम ऑफ द टूर्नामेंटची घोषणा; भारताच्या ४ खेळाडूंचा समावेश

**मुंबई, ता. १० :** भारतीय संघ यंदाच्या टी-२० विश्वचषक २०२६ चा विजेता ठरला आहे. टीम इंडियाने अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा तब्बल ९६ धावांनी पराभव करत विक्रमी तिसऱ्यांदा ट्रॉफीवर नाव कोरलं आहे. संजू सॅमसन या स्पर्धेचा प्लेअर ऑफ द टूर्नामेंट ठरला. यासह आता आयसीसीने टी-२० विश्वचषक २०२६ च्या टीम ऑफ द टूर्नामेंटची घोषणा केली आहे. ज्यामध्ये भारताच्या ४ खेळाडूंचा समावेश आहे, पण विश्वचषक विजेता कर्णधार सूर्यकुमार यादवचा मात्र यात समावेश नाही, या संघाचा कर्णधार आयसीसीच्या टीम ऑफ द टूर्नामेंटचा कॅप्टन आहे.




आयसीसीच्या टीम ऑफ द टूर्नामेंटमध्ये सर्वाधिक विश्वविजेत्या भारतीय संघाच्या खेळाडूंचा समावेश आहे. चार भारतीय खेळाडू या संघात आहेत, तर दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडचे प्रत्येकी दोन खेळाडू आहेत. आयसीसीने या संघात पाकिस्तान, झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिजमधील प्रत्येकी एका खेळाडूचा समावेश केला आहे. उपविजेत्या न्यूझीलंड संघातील एकाही खेळाडूचा या संघात समावेश नाही.

टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये सर्वाधिक धावा करणारा पाकिस्तानचा साहिबजादा फरहान आणि प्लेअर ऑफ द टूर्नामेंट असलेला संजू सॅमसन यांची सलामी जोडी म्हणून निवड करण्यात आली आहे. तिसऱ्या क्रमांकासाठी इशान किशनचा संघात समावेश आहे. इशान स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा चौथा फलंदाजदेखील आहे. स्पर्धेच्या गट टप्प्यात शानदार गोलंदाजी करणाऱ्या अमेरिकेच्या शॅडली शान शाल्कविकला १२ वा खेळाडू म्हणून स्थान मिळालं आहे.

२०२६ च्या टी-२० विश्वचषकातील कामगिरीच्या आधारे आयसीसीच्या संघात चार भारतीय खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. हार्दिक पंड्या, संजू सॅमसन आणि इशान किशन यांच्यासह स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स घेणारा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहचा समावेश आहे. बुमराहने स्पर्धेत सर्वाधिक १४ विकेट्स घेतल्या आहेत. सुपर-८ टप्प्यात पोहोचलेल्या झिम्बाब्वे संघाच्या कामगिरीने यंदा सर्वांना प्रभावित केले आणि संघातील ब्लेसिंग मुझारबानीची आयसीसी संघात निवड करण्यात आली आहे.

आयसीसीच्या टीम ऑफ द टूर्नामेंट संघाचा कर्णधार म्हणून दक्षिण आफ्रिकेच्या एडन मारक्रमची निवड करण्यात आली आहे. पण भारताचा विश्वचषक विजेता कर्णधार सूर्यकुमार यादवची मात्र निवड झालेली नाही.

टी-२० विश्वचषक २०२६ आयसीसीची टीम ऑफ द टूर्नामेंट : साहिबजादा फरहान, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), इशान किशन, एडन मारक्रम (कर्णधार), हार्दिक पंड्या, विल जॅक्स, जेसन होल्डर, जसप्रीत बुमराह, लुंगी एनगिडी, आदिल रशीद, ब्लेसिंग मुझाराबानी, शेडली शान शाल्क्किक (१२ वा खेळाडू).

# पिंपरी दुमाला येथे मध्यरात्री गोठ्याला भीषण आग; बैलगाडा शर्यतीतील दोन बैल होरपळले

**अक्षय टेमगिरे**

शिरुर, ता. १० : शिरूर तालुक्यातील पिंपरी दुमाला येथे मध्यरात्री गोठ्याला भीषण आग लागून बैलगाडा मालकाचे मोठे नुकसान झाल्याची घटना घडली आहे. या आगीत बैलगाडा शर्यतीसाठी तयार केलेले दोन बैल होरपळल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी दुमाला येथील थोरातवस्तीतील गोरक्ष संतोष थोरात वय २१ वर्ष यांच्या मालकीच्या गोठ्याला सोमवार ता. ९ रोजी मध्यरात्री सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली असून. या घटनेच्या वेळी घरातील सर्वजण झोपेत होते. गोरक्ष थोरात यांचा भाऊ नवनाथ थोरात हा गोठ्यात झोपला होता, तर आई रोहिणी थोरात या घराबाहेर झोपल्या होत्या.

दरम्यान, रोहिणी थोरात यांना अचानक जाग आल्यावर गोठ्याला आग लागलेली दिसली. त्यांनी मोठ्याने आरडाओरडा केल्याने घरातील सर्वजण जागे झाले. बाहेर येऊन पाहिले असता गोठ्याच्या वरच्या बाजूला आग लागलेली होती आणि आगीच्या ठिणग्या खाली बैलांवर पडत होत्या. या आगीत बैलगाडा शर्यतीतील बैलजोडी गंभीररीत्या भाजली असून संपूर्ण गोठ्याचेही मोठे नुकसान झाले आहे.

विशेष म्हणजे संबंधित गोठ्यामध्येकोणतेहीविजेचेकनेक्शन नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे आग नेमकी कशामुळे लागली, याबाबत संभ्रम निर्माण झाला असून घातपाताची शक्यताही नाकारता येत नाही. या घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, या घटनेबाबत गोरक्ष संतोष थोरात यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात खबरी जबाब दिला असून पुढील तपास सुरू आहे. या आगीत थोरात कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून जखमी बैलांचा तात्काळ पंचनामा करून शेतकऱ्याला नुकसान भरपाई द्यावी, तसेच घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे.

# उरुळी कांचन येथे २४ तासांत दोन अपघात दोघांचा जागीच मृत्यू, प्रशासन झोपेत?

**उरुळी कांचन, ता. १० :** पुणेसोलापूर महामार्गावर उरुळी कांचन परिसरात रस्ता ओलांडणाऱ्या दोघांचा मृत्यू झाला. भरधाव वाहने, बेदरकार चालक आणि अपुऱ्या नियंत्रणामुळे पुणे - सोलापूर महामार्ग अक्षरशः मृत्यूचा सापळा बनत चालला आहे.




पहिली घटना सोमवारी (ता. ०९) रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास उरुळी कांचन हद्दीतील श्रीकृष्ण फर्निचरसमोर घडली. सोमलाल डोमार रजक (वय-३१, सध्या रा. चौधरी माथा, उरुळी कांचन ; मूळ रा. लालपूर, ता. गंडई, जि. केसीजी, छत्तीसगड) हे आपल्या भावासोबत रस्ता ओलांडत असताना पुण्याकडून भरधाव वेगात येणाऱ्या एमएच ४२ बीएफ ७६४३ क्रमांकाच्या टोयोटा कारने त्यांना जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत सोमलाल रजक यांचा जागीच मृत्यू झाला.

याप्रकरणी त्यांचा भाऊ सवाना डोमार रजक (वय ४०, व्यवसाय मजुरी, यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून कार चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५, (अ), १२५ (ब), १०६ (१) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरी घटना त्याच रात्री सुमारे साडेबारा वाजण्याच्या सुमारास तळवडी चौक येथे घडली. उत्तम बबन भंडारे (वय-५३, रा. शिंदवणे चौक, उरुळी कांचन) हे पुणेसोलापूर महामार्ग ओलांडत असताना सोलापूरकडून पुण्याकडे येणाऱ्या एमएच १२ एसएक्स ८९८५ क्रमांकाच्या भरधाव बल्कर ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, ट्रक त्यांच्या अंगावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या प्रकरणी त्यांच्या मुलगी प्रिती मयूर शेंबेकर (रा. चिंचवड, पुणे) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून ट्रक चालक प्रणव प्रदीप शिंदे (वय -२०) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५, (अ), १२५ (ब), १०६ (१) व मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, अवघ्या काही तासांच्या अंतराने दोन जणांचे बळी गेल्याने उरुळी कांचन परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पुणेसोलापूर महामार्गावर वेग नियंत्रण, वाहतूक नियमन व पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना का केल्या जात नाहीत, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. वारंवार अपघात होऊनही प्रशासन व वाहतूक पोलिसांकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने हा महामार्ग दिवसेंदिवस अधिकच धोकादायक बनत चालल्याची टीका स्थानिकांकडून केली जात आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## त्वचेवर सुरकुत्या पडू नयेत म्हणून ही काळजी घ्यायलाच हवी, वाचा

आपल्या शरीराला प्रामुख्याने पाण्याची गरज ही खूप असते. पाण्याचे योग्य प्रमाण शरीरात असल्यामुळे, शरीर हायड्रेट राहते आणि अनेक आजार दूर होतात. त्वचेच्या सौंदर्यासाठी आपण सर्व प्रकारचे उपाय करतो, ज्यामध्ये फेस मास्क आणि महागड्या उत्पादनांचा समावेश असतो, परंतु शरीराला हायड्रेट ठेवल्याशिवाय, चेहऱ्यावर अपेक्षित चमक मिळवता येत नाही याकडे आपण दुर्लक्ष करतो.

त्वचेची योग्य पीएच पातळी असणे खूप महत्वाचे आहे. जास्त पीएचमुळे त्वचा कोरडी पडू लागते. त्वचेचा पीएच राखण्यासाठीही पाणी पिणे हे खूपच फायदेशीर ठरते. शरीरात विषारी पदार्थांच्या उपस्थितीमुळे मुरुम, ऍलर्जी, तेलकट त्वचा होऊ शकते. हे विष बाहेर टाकण्यासाठी पाणी देखील प्यावे. पुरेसे पाणी प्यायल्याने शरीर आणि त्वचा दोन्ही हायड्रेट राहते. त्यामुळे सुरकुत्या, भेगा पडत नाहीत. त्वचेचा तजेला टिकविण्यासाठी कोमट पाणी पिणे हे सर्वाधिक गरजेचे आहे.

तुम्हाला चहा किंवा कॉफी वारंवार पिण्याची सवय असेल तर, त्याआधी किमान एक ग्लास पाणी प्या. डिटॉक्स केलेले पाणी पिण्यामुळे त्वचेला तजेला येतो. वयोमानानुसार, त्वचा ओलावा टिकवून ठेवण्यात कमकुवत होते. पण, पुरेसे पाणी प्यायल्याने त्वचेत ओलावा टिकून राहतो. त्वचेचा रक्तसंचयही चांगला वाढण्यासाठी पाणी पिणे हे खूप गरजेचे आहे. पाणी पिण्यामुळे त्वचेचा पोतही सुधारतो आणि त्वचेचा रंगातही सुधार होतो..

दिवसातून किती ग्लास पाणी प्यावे?

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, चयापचय, वजन, उंची आणि त्वचेसाठी दररोज ६ ते ८ ग्लास पाणी प्यावे. त्यामुळे त्वचेचा घट्टपणा, चमक आणि तसेच त्वचेचे आरोग्यही उत्तम टिकून राहते.

# आरटीई प्रवेशासाठी १ किलोमीटर अंतराची अट उच्च न्यायालयाकडून स्थगित

**नागपूर, त. १० :** शिक्षणाच्या हक्क कायद्याअंतर्गत प्रवेशासाठी लागू केलेल्या १ किमी अंतराच्या अटीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सोमवारी स्थगिती दिली. हा नियम कायद्याच्या तरतुदींशी विसंगत असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यामुळे महाराष्ट्र सरकारला हा मोठा धक्का मानला जात आहे




न्यायमूर्ती अनिल पानसरे आणि न्यायमूर्ती निवेदिता मेहता यांच्या खंडपीठाने या प्रकरणी महाराष्ट्र सरकारला नोटीस बजावून उत्तर मागितले. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयाद्वारे हा नियम लागू करण्यात आला होता. या नियमाला आव्हान देणाऱ्या जनहित याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने ही नोटीस जारी केली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील जयना कोठारी यांच्यासह वकील पायल गायकवाड आणि दीपांकर कांबळे यांनी बाजू मांडली.

या प्रकरणाची पुढील सुनावणी १० मार्च रोजी ठेवण्यात आली आहे. नागपूरमधील सामाजिक कार्यकर्ते आशीष फुलझेले, अनिकेत कुत्तरमारे, वैभव कांबळे तसेच चंद्रपूरमधील शंकर आत्राम आणि करिश्मा बांगे यांनी या संदर्भात जनहित याचिका दाखल केली होती. राज्य सरकारने लागू केलेला १ किमी अंतराचा नियम मुलांच्या शिक्षणाच्या हक्कावर अन्यायकारक बंधने घालणारा असून शिक्षणाच्या हक्क कायद्याच्या उद्देशालाच बाधा आणणारा असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला. याचिकेत नमूद करण्यात आले की, आरटीई कायद्याच्या कलम १२(१)(क)नुसार खाजगी, अनुदान न घेणाऱ्या आणि अल्पसंख्याक नसलेल्या शाळांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि वंचित गटांतील मुलांसाठी २५ टक्के जागा राखीव ठेवणे बंधनकारक आहे. मात्र राज्य सरकारच्या ऑनलाइन प्रवेश प्रणाली मध्ये पालकांना त्यांच्या घरापासून केवळ १ किमी अंतरावरील शाळाच दिसत असल्याने अनेक शाळांमध्ये अर्ज करण्याची संधी मर्यादित होत असल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला. तसेच प्रवेश पोर्टलवरील मॅपिंग प्रणालीमुळे पत्त्याची नोंदणी करताना जीपीएस मार्कर १ किमीच्या परिघाबाहेर हलवता येत नाही, असा मुद्दाही त्यांनी मांडला. याशिवाय प्रणालीने दिलेली शाळा पालकांनी स्वीकारली नाही तर दुसऱ्या शाळेची निवड करण्याची संधीही दिली जात नसल्याचे त्यांनी सांगितले.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने नमूद केले की, शासन निर्णयाद्वारे लादलेल्या या अटी प्रथमदर्शनी आरटीई कायद्याच्या तरतुदींशी तसेच हिंदुस्थानच्या राज्यघटनेतील कलम १४, कलम २१ आणि कलम २१ अंतर्गत दिलेल्या हमींशी विसंगत वाटतात. या प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत न्यायालयाने १ किमी अंतराच्या अटीची अंमलबजावणी स्थगित ठेवण्याचे आदेश दिले. तसेच प्रवेश प्रक्रिया कायद्यानुसार पार पाडण्यासाठी राज्य सरकारने ऑनलाइन प्रवेश प्रणालीमध्ये आवश्यक बदल करावेत, असेही निर्देश न्यायालयाने दिले. न्यायालयाने स्पष्ट केले की, आरटीई योजनेंतर्गत प्रवेश प्रक्रिया ही कायद्यातील तरतुदींनुसारच पार पडली पाहिजे.

## गॅसच्या तुटवड्यामुळे मुंबईतील २० टक्के हॉटेल्स बंद

**मुंबई, ता. १० :** आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या इराण-इस्त्रायल-अमेरिका संघर्षाचा परिणाम आता भारतातील हॉटेल उद्योगावरही दिसू लागला आहे. इराण-इस्त्रायल-अमेरिका संघर्षामुळे गॅसचा तुटवडा निर्माण झाला असून मुंबईतील जवळपास २० टक्के हॉटेल्स बंद ठेवण्यात आली आहेत, अशी माहिती आहार या संघटनेने दिली आहे.

हा तुटवडा तुटवडा कायम राहिल्यास येत्या तीन दिवसात ५० टक्के हॉटेल्स बंद होण्याची शक्यता वर्तवली जातीय. गॅसचा तुटवडा आणखी काही दिवस कायम राहिल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. पुढील तीन दिवसही गॅस पुरवठा सुरळीत झाला नाही, तर मुंबईतील सुमारे ५० टक्के हॉटेल्स बंद करण्याची वेळ येऊ शकते, असा इशारा आहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. या समस्येबाबत आहार संघटना केंद्रीय पेट्रोलियम मंत्र्यांशी संवाद साधत आहे.

# वाघोलीत कपड्यांच्या दुकानात कपडे नीट ठेवण्यावरून वाद; कामगारावर चौघांचा हल्ला

**वाघोली, ता. १० :** कपड्यांच्या दुकानात काम करणाऱ्या सहकाऱ्याला कपडे व्यवस्थित ठेवण्यास सांगितल्याचा राग मनात धरून संतप्त झालेल्या तरुणाने आपल्या तीन साथीदारांसह कामगारावर हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात २२ वर्षीय कामगार गंभीर जखमी झाला असून त्याच्या डोक्याला चार टाके पडले आहेत.

मोहम्मद निजामुद्दीन मन्सुरी (वय २२, रा. ग्रीन हॉटेल मागे, केसनंद, ता. हवेली, जि. पुणे) असे जखमी तरुणाचे नाव आहे. त्यांच्यावर वाघोली येथील लाईफ लाईन हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत. याप्रकरणी मन्सुरी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ओमकार मदन फुलारे (रा. बजरंग भेळ जवळ, आव्हाळवाडी) व अनोळखी तिघांवर वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मन्सुरी हे आव्हाळवाडी येथील एस.पी. कॉटन कपड्यांच्या दुकानात मजुरीचेकामकरतात. शनिवारी (ता. ०७) रात्री पाऊणे नऊ वाजण्याच्या सुमारास ते दुकानात काम करत असताना त्यांच्यासोबत काम करणाऱ्या ओमकार मदन फुलारे (रा. बजरंग भेळ जवळ, आव्हाळवाडी) याला कपडे व्यवस्थित ठेवण्यास सांगितले. यावरून दोघांमध्ये वाद झाला. मन्सुरी यांनी मोठ्याने ओरडल्याचा राग मनात धरून ओमकार फुलारे हा दुकानातून बाहेर गेला आणि काही वेळातच आपल्या तीन साथीदारांसह परत आला. चौघांनी मिळून मन्सुरी यांच्याशी वाद घालत शिवीगाळ सुरू केली. मन्सुरी यांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्यावर लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. त्यानंतर एका इसमाने जड वस्तूने त्यांच्या कपाळावर जोरात वार केला. या हल्ल्यात त्यांच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. घटनेनंतर आरोपी चौघेही तेथून पळून गेले. त्यानंतर मन्सुरी यांनी दुकान मालक सचिन परी यांना फोन करून घटनेची माहिती दिली. परी यांनी तत्काळ त्यांना आव्हाळवाडी येथील केअर हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार करताना त्यांच्या डोक्याला चार टाके पडल्याचे डॉक्टरांनी सांगितले.




दरम्यान, तक्रार देण्यासाठी जात असताना मन्सुरी यांना पुन्हा चक्कर आल्याने त्यांना वाघोली येथील लाईफ लाईन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यानुसार पुढील तपास वाघोली पोलीस करीत आहेत.

## बोपदेव घाटात भीषण वणवा हजारो झाडे जळून खाक

**पुणे, ता. ९ :** पुणे जिल्ह्यातील बोपदेव घाट परिसरात लागलेल्या भीषण वणव्यामुळे मोठ्या प्रमाणात वनसंपत्तीचे नुकसान झाले असून हजारो झाडे जळून खाक झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. डोंगररांगांवर पसरलेल्या आगीमुळे संपूर्ण घाट परिसर धुराच्या ढगांनी वेढला होता.

स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींच्या माहितीनुसार, कोरडे गवत, वाढलेले तापमान आणि वाऱ्याचा वेग यामुळे आग झपाट्याने पसरली. परिणामी, मोठ्या प्रमाणात झाडे, झुडपे आणि वनस्पती जळून नष्ट झाल्याने परिसरातील जैवविविधतेला मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बोपदेव घाट हा पुणे शहरालगतचा एक महत्त्वाचा हरित पट्टा मानला जातो. येथे विविध प्रकारचे पक्षी, लहान प्राणी आणि दुर्मिळ वनस्पती आढळतात. मात्र या वणव्यामुळे अनेक पक्ष्यांची घरटी, लहान प्राण्यांचे अधिवास आणि नैसर्गिक वनस्पतींचे मोठे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान, आग लागल्यानंतर वनविभागाने तातडीने कारवाई केली नाही, असा आरोप स्थानिक पर्यावरणप्रेमींनी केला आहे. योग्य वेळी यंत्रणा आणि मनुष्यबळ तैनात केले असते तर नुकसान कमी झाले असते, असे त्यांचे म्हणणे आहे.

उन्हाळ्याच्या सुरुवातीला घाट परिसरात मोठ्या प्रमाणात कोरडे गवत साचलेले असते. त्यातच काही वेळा पेटती सिगारेट, कचरा जाळणे, शेकोटी किंवा मानवी निष्काळजीपणा यामुळे वणवे भडकण्याची शक्यता वाढते. या घटनेनंतर पर्यावरणप्रेमींनी वनविभागाकडे सखोल चौकशीची मागणी केली आहे.

## इंदापूरमध्ये शासकीय कारवाई दरम्यान तहसीलदारांना मारहाण

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. १० : निमगाव केतकी (ता. इंदापूर) हद्दीत गौण खनिज वाहतुकीची तपासणी करत असताना इंदापूरचे तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी जीवन बनसोडे यांना अडवून मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी संतोष रामदास मोरे (रा. वरकुटे खुर्द) याच्याविरुद्ध इंदापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

> मुरूम वाहतुकीची तपासणी सुरू असताना संबंध नसलेल्या संतोष मोरे याने पैसे वसूल करण्याचा आग्रह धरत मला मारहाण केली.
> - **जीवन बनसोडे,** तहसीलदार, इंदापूर

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (ता. ०९) दुपारी सुमारे सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास पिटकेश्वर रोडवर तहसीलदार जीवन बनसोडे हे नायब तहसीलदार विजय घुगे, अविनाश डोडफोडे, महसूल सहाय्यक राहुल पारेकर व वाहनचालक मल्हारी मखरे यांच्यासह गौण खनिज वाहतूक करणाऱ्या टिपरची तपासणी करत होते. यावेळी संतोष मोरे याने आपली बुलेट मोटारसायकल तहसीलदारांच्या शासकीय वाहनासमोर आडवी लावून कारवाईत अडथळा निर्माण केला. टिपरवर कारवाई करून आत्ताच पैसे वसूल करा, अशी मागणी करत त्याने गोंधळ घातला. तहसीलदारांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला असता मोरे याने शिवीगाळ करत इंदापूरमध्ये नोकरी कशी करता ते पाहतो, अशी धमकी दिली. त्यानंतर त्याने तहसीलदारांची कॉलर पकडून त्यांना मारहाण केली. तसेच दहा हजार रुपयांची मागणी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेमुळे महसूल विभागात खळबळ उडाली असून पोलिस निरीक्षक विलास नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक जीवन मोहिते पुढील तपास करत आहेत.


## आबा सायकर यांचे निधन



उरुळी कांचन, ता. ९ : येथील महात्मा गांधी विद्यालयात कला शिक्षक म्हणून कार्यरत असणारे आबा गोरक्षनाथ सायकर (वय ५२, सायकरवाडी, फुरसुंगी) यांचे सोमवारी (ता. ०९) सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. विद्यार्थी प्रिय, अत्यंत प्रेमळ व हुशार व्यक्तिमत्व हरपल्याने पूर्व हवेलीत शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात वडील, भाऊ, पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.

## केंद्र सरकारने देशात लागू केला एस्मा कायदा; युद्धामुळे गॅस टंचाईची भीती

**नवी दिल्ली, ता. १० :** मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षा मुळे जगातील इंधन, गॅस पुरवठा विस्कळीत झाला आहे. घरगुती गॅसच्या रुपाने स्वयंपाकघरातही याची झळ पोहोचली आहे. दरम्यान, घरगुती गॅसचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी केंद्र सरकारने मंगळवारी अत्यावश्यक वस्तू कायदा (एउ कायदा) लागू केला आहे.




गेल्या ११ दिवसांपासून अमेरिका इस्त्रायलने इराणविरोधात युद्ध छेडले आहे. यामुळे जगातील खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. पुरवठा विस्कळीत झाल्याने महाराष्ट्रासह देशात याची घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवत आहे. यापार्श्व भूमीवर केंद्र सरकाराने देशात एस्मा कायदा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्यामुळे देशात आवश्यक वस्तूंची साठवणूक आणि काळा बाजारास आळा बसणार आहे.

**काय आहे आदेश?**

अधिकृत आदेशानुसार, केंद्र सरकारने रिफायनरीज आणि पेट्रोकेमिकल युनिट्सना द्रव पेट्रोलियम गॅस (LPG) चे उत्पादन जास्तीत जास्त करण्याचे आणि प्रमुख हाड्रोकार्बन प्रवाह LPG पूलमध्ये वळवण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, विशिष्ट क्षेत्रांना नैसर्गिक वायूचा पुरवठा प्राधान्य वाटप म्हणून विचारात घेतला जाणार आहे.

अमेरिका इस्त्रायलने इराणविरुद्ध युद्ध सुरु केल्याने आखाती देशातील अमेरिका आणि इस्त्रायलच्या लष्करी तळ तसेच इतर ठिकाणांवर इराणकडून हल्ले केले जात आहे. इराणकडून होर्मुज समुद्रधुनी देखील अद्याप सुरळीत न केल्याने जगात इंधन आणि नैसर्गिक गॅसची कमतरता निर्माण झाली आहे. भारतात व्यावसायिक आणि घरगुती गॅसची कमतरता निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी नागरिक गॅससाठी रांगा लावताना दिसत आहेत. सरकारने एस्मा कायदा लागू केल्याने देशात घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत राहणार आहे.

## अंतिम अहवाल आल्यानंतरच बोलता येईल; अजितदादांच्या अपघातावर सुनेत्रा पवारांचे भाष्य

**बारामती, ता. १० :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची चौकशी सध्या विविध यंत्रणांकडून सुरू आहे. या प्रकरणाचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असला तरी संपूर्ण आणि अंतिम अहवाल अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे अंतिम अहवाल आल्यानंतरच या विषयावर अधिक सविस्तर बोलता येईल, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले.



महिला दिनानिमित्ताने पुणे जिल्हा परिषदेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या मिनी सरस सावित्री जत्रा या बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची विक्री आणि प्रदर्शनाच्या उद्घाटनानंतर सुनेत्रा पवार पत्रकारांशी बोलत होत्या. यावेळी त्यांनी अजित पवार यांचा विमान अपघातातील मृत्यू आणि पार्थ पवार यांच्या राज्यसभेवरील निवडीबद्दल प्रथमच भाष्य केले.

अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या तपासाबाबत बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या, या अपघाताची चौकशी सध्या विविध यंत्रणांकडून सुरू आहे. या प्रकरणाचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असला तरी संपूर्ण आणि अंतिम अहवाल अद्याप प्रलंबित आहे. मात्र, संपूर्ण अहवाल अद्याप आलेला नाही. त्यामुळे अंतिम अहवाल आल्यानंतरच या विषयावर अधिक सविस्तर बोलता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. पार्थ पवार यांच्या राज्यसभेवरी ल निवडीबद्दल सुनेत्रा पवार यांनी पार्थ पवार यांना शुभेच्छा दिल्या. त्या म्हणाल्या, राज्यसभा हे देशातील वरिष्ठ आणि अनुभवी सदस्यांचे सभागृह आहे. राज्यसभा हे उच्च आणि अनुभवी लोकांचे सभागृह आहे. त्यामुळे तिथे काम करताना सर्वप्रथम सभागृहाची कार्यपद्धती, नियम आणि परंपरा समजून घेणे महत्त्वाचे असते. पार्थ पवार हे या सर्व गोष्टी शिकून घेतील आणि नक्कीच चांगली कामगिरी करतील.

## बारामतीत अज्ञात वाहनाच्या धडकेत ग्रामसेवकाचा दुर्दैवी मृत्यू

**बारामती, ता. १० :** बारामती तालुक्यातील जळगाव क.प. गावाजवळील राज्य मार्गावर सोमवारी (ता. ०९) रात्री झालेल्या भीषण अपघातात एका ग्रामसेवकाचा जागीच मृत्यू झाला. अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत हा अपघात घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी काही काळ रास्ता रोको आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.



या अपघातात मधुकर धोंडीबा जगताप (रा. भिलारवाडी) यांचा मृत्यू झाला. ते मेडद ग्रामपंचायतीत ग्राम सेवक म्हणून कार्यरत होते. सोमवारी रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास काम आटोपून ते घरी परतत असताना जळगाव क.प. गावाजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की जगताप यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. या राज्य मार्गावर गतिरोधक नसल्यामुळे वारंवार अपघात होत असल्याचा आरोप करत संतप्त ग्रामस्थांनी काही काळ जळगाव क.प. येथे रास्ता रोको आंदोलन केले.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच माळेगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे आणि त्यांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणली. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून लवकरच गतिरोधक बसवण्यात येतील, असे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले.

दरम्यान, अपघात घडवून पळून गेलेल्या वाहनाचा क्रमांक पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती समोर आली असून संबंधित चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत. कर्तव्यदक्ष आणि मनमिळावू स्वभावामुळे ओळख असलेल्या मधुकर जगताप यांच्या आकस्मिक निधनाने भिलारवाडी आणि मेडद परिसरात शोककळा पसरली आहे.

# युध्दामुळे फळे, कांदा निर्यातीला फटका; रमजानमध्ये आखाती देशातील बाजारपेठ बंदचा परिणाम

**पुणे, ता. १० :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचा मोठा फटका भारतीय शेतमाल निर्यातीला बसला आहे. रमजानच्या महिन्यात इराणसह आखाती देशातून भारतातील फळे, कांद्याला मोठी मागणी असते. मात्र, निर्यात पूर्णपणे ठप्प झाल्याने शेतकरी आणि व्यापारी हवालदिल झाले आहेत. नवी मुंबई येथील पं. जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या (न्हावा शेवा) बंदरावर केळी, द्राक्षे, कांदा, तांदुळ यांचे ५०० ते ६०० कंटेनर माल निर्यातीसाठी उभे आहेत.

नवी मुंबईतील बंदरातून निघालेले जहाज इराणध्ये पोहोचण्यास सात ते आठ दिवसांचा कालावधी लागतो. आतापर्यंत इराणसह अन्य आखाती देशात ते कंटेनर शेतमालाची निर्यात करण्यात आली आहे. मात्र, तेथे बंदरावर शेतमाल उतरवून घेण्यात येत नाही. बंदरावरील वीजपुरवठा, तसेच शीतगृहाचा वीजपुरवठा खंडीत झाल्याने शेतमाल खराब होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत भारतातील निर्यातदार आणि शेतकऱ्यांचे अंदाजे १२५ ते १५० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील श्री गुरुदत्त इम्पॅक्सचे संचालक, फळांचे आयात-निर्यातदार सत्यजित सुयोग झेंडे यांनी दिली.

बाजारात जुन्या, नव्या कांद्याची आवक वाढली आहे. कांद्याची निर्यात जवळपास थांबली आहे. घाऊक बाजारात कांदा दरात घट झाली आहे असे मार्केट यार्डातील कांदा व्यापारी राम नरवडे यांनी नमूद केले.



**शेतमालाचे ५०० ते ६०० कंटेनर बंदरावर**

इराण, तसेच अमेरिका, इस्त्राइलकडून क्षेपणास्त्र हल्ले करण्यात येत आहे. हल्ले-प्रतिहल्ल्यांमुळे इराणसह आखाती देशातील बाजारपेठा बंद आहेत. जल वाहतूक ठप्प झाली आहे. पं. जवाहरलाल नेहरू बंदरावर २५० ते ३०० कंटेनर केळी, १०० कंटेनर द्राक्षे, अन्य शेतमालाचे १०० ते २०० कंटेनर उभे आहेत.

**आयातीवर परिणाम; इराणी सफरचंद महाग**

इराणमधूनसफरचंद, किवीची मोठी आवक होते. भारतात पाठविण्यात येणारे ८०० ते ९०० कंटेनर इराणमधील बंदरावर अडकल्याचा अंदाज आहे. २६ फेब्रुवारीपासून इराणमधून होणारी आवक ठप्प झाली आहे.

इराणी सफरचंदाच्या दरात किलोमागे ३० ते ४० रुपयांनी वाढ झाली आहे. घाऊक बाजारात एक किलो इराणी सफरचंदाचे दर १५० ते १६० रुपये आहेत. गेल्या आठवड्यात दहा किलो किवीचे दर १४०० ते १५०० रुपये होते. सध्या घाऊक बाजारात दहा किलो किवीचे दर १८०० ते १९०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत.